**C** SL. No. : XX

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 64 ]
Total No. of Questions : 64 ]

**CCE PF**
**CCE PR**
**REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ & ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Fresh & Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 21. 03. 2019 ] [ Date : 21. 03. 2019

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 09-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 64 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारीत )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : 16 × 1 = 16

1. 'अनंतशक्ती परमेश्वर' या पाठाचे मूल्य काय ?
2. कोणत्या अंधाला हत्ती सुपासारखा वाटला ?
3. सुतार सरदाराचे नाव काय ?
4. महात्मा ज्योतीबा फुलेंच्या दत्तक पुत्राचे नाव काय ?
5. सावित्रीबाईंचा जन्म कोणत्या गावी झाला ?
6. गायी कोण हाकतो आहे ?
7. 'पीकपाणी' हा कवितासंग्रह कोणी लिहिला ?
8. वेल कोठे चढते ?
9. चुलीतल्या लाकडाने कुठे जळावे ?
10. स्त्रीया आपले दुःख कुठे पुरुन ठेवतात ?
11. अभंगाचे बळ कसे आहे ?
12. 'मनाचे पिंजरे' हा पाठ कोणत्या लघुनिबंध संग्रहातून घेतला आहे ?
13. डॉ. कोल्हे यानी आयोजीत केलेल्या शिबिरातून किती कार्यकर्त्ते तयार झाले ?
14. कशाची उंडी ज्ञानेश्वर कावळयाच्या तोंडाला लावणार आहेत ?
15. भीमक कोणत्या देशाचा राजा होता ?
16. कष्टाची माळ म्हणजे काय ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : 13 × 2 = 26

17. ''तुम्ही त्याशी कशासाठी भांडता ? तो पुण्यवान आहे.'' संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

18. आत्मविश्वासाने आंबेडकरांनी काय मिळविले ?

19. गंगुबाईंनी आपल्या गुरूंना कोणती गुरूदक्षिणा दिली ?

20. 'संत ज्ञानेश्वरांच्या' साहित्याची माहिती लिहा.

21. 'पाहुणे' कसे निगरगट्ट आहेत ते सांगा ?

22. 'धरण' बांधताना तिने कोणते कष्ट सोसले ?

23. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिचय थोडक्यात लिहा.

24. सर्व सरदारांनी चिमाजीआप्पांना काय सांगितले ?

25. वाटणीच्या घोळाने घरांत काय घडत होते ?

26. फुले शाळेत कशा प्रकारे मश्गुल असायचे ?

27. वर बोट करुन आई आपल्या बाळ्याला काय सांगते ?

28. कामावर जाण्यापूर्वी पहाटेला ती कोणती कामे करते ?

29. तिच्या संसाराला वणवा का म्हंटले आहे ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 10 × 3 = 30

30. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?

31. लेखकांनी कोणती छत्री निवडली ? का ?

32. शिबिरं घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का झाले ?

33. तात्यांना कोणत्या मुलाचा राग येत होता ? का ?

34. आडावरुन घागर घेऊन येताना लेखक कोणत्या प्रश्नांच ओझ घेऊन आले ?

35. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?

36. 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणतो ?

37. 'कुसुमाग्रज' यांचा थोडक्यात परिचय लिहा.

38. बेळगावो काँग्रेस मधील घटनांचे वर्णन करा.

39. गराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतो ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : 5 × 4 = 20

40. 'जपानी' स्त्रीचे सविस्तर वर्णन करा.

41. 'हिरवे सांगाती' या पाठातील वृक्षांची माहिती लिहा.

42. 'गाऊ त्यांना आरती' कवितेचा सारांश लिहा.

43. 'भारत' कसा असावा असे संत तुकडोजी महाराजांना वाटते ?

44. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा —

कवच भूमिचे ..............................................................

..............................................................................

..............................................................................

..................................................... आज असे सत्कार.

## विभाग-B

### ( व्याकरणावर आधारीत )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10

45. 'संधी' म्हणजे काय ?

(अ) फायदा (ब) सांधने

(क) सांधणे (ड) साधन.

46. विभक्तीचे एकुण प्रकार किती ?

(अ) पाच (ब) सात

(क) तीन (ड) आठ.

47. 'आक्का गंभीरच होत होती' वाक्याचा प्रयोग ओळखा.

(अ) कर्तरी प्रयोग (ब) भावे प्रयोग

(क) कर्मणी प्रयोग (ड) या पैकी नाही.

48. 'माधवी नृत्य करत आहे' वाक्याचा काळ ओळखा.

(अ) वर्तमान काळ (ब) अपूर्ण वर्तमान काळ

(क) भूत काळ (ड) अपूर्ण भूत काळ.

49. 'सुपातील हसतात् जात्यातील .............. ' म्हण पूर्ण करा.

(अ) रडतात (ब) नाचतात

(क) धावतात (ड) ओरडतात.

50. 'तू खळ आणि अभ्यास कर.' हे या प्रकारचे वाक्य आहे –

(अ) केवल वाक्य (ब) मिश्र वाक्य

(क) संयुक्त वाक्य (ड) उद्गारार्थी वाक्य.

51. 'पदोपदी' हा या प्रकारचा समास आहे –

(अ) अव्ययीभाव समास (ब) द्वंद्व समास

(क) समाहार द्वंद्व समास (ड) द्विगू समास.

52. 'सावकाश होत जाणारा बदल' शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.

(अ) क्रांती (ब) उत्क्रांती

(क) उसासा (ड) उद्वीग्न.

53. "तो नदीत पोहत आहे" या वाक्यातील 'तो' या शब्दाची जात ओळखा.

(अ) नाम (ब) सर्वनाम

(क) विशेषण (ड) क्रियापद.

54. संस्कृत भाषेतून मराठीत येताना थोडाफार बदल करुन आलेल्या शब्दांना असे म्हणतात –

(अ) तत्सम (ब) तद्भव

(क) परभाषिय (ड) देशी.

VI. खालील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा : $4 \times 1 = 4$

55. आळी : गल्ली : : आरमार : .............

56. आशा : निराशा : : निरक्षर : .............

57. आई : स्त्रीलिंग : : हिमालय : .............

58. वाक्यालील महत्वाचा शब्द : ' ' : : बोलणाऱ्याच्या तोंडचे वाक्य : .............

VII. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : $3 \times 2 = 6$

59. अरे वेड्या सोनचाफ्या । काय तुझारे बहर नाही पाहिलीस माझी । चाफेकळी सोनगौर.

अलंकार ओळखा आणि लक्षणे लिहा

60. 'झालेच मित्र पण सोडुनि पाठ मोरे' गण पाडून वृत्त ओळखा.

61. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

i) अधःपतन होणे

ii) भान हरपणे.

## विभाग-C

### ( लेखन व रचनेवर आधारीत )

VIII. 62. खालील पैको **एका** कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3

i) 'सत्यमेव जयते'

ii) जसे कर्म; तसे फळ.

IX. 63. तुमच्या लहान भावास योगासनाचे महत्त्व सांगणारे पत्र लिहा. 1 × 5 = 5

**किंवा**

वाहनांच्या आवाजाचा होणारा त्रास व त्याचा अभ्यासावर होणारा परिणाम व्यक्त करणारे; पत्र पोलिस अधिक्षकास लिहा.

X. 64. खालीलपैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळी निबंध लिहा : 1 × 5 = 5

i) पर्यावरणाचे संरक्षण

ii) राष्ट्रीय एकात्मता काळाची गरज

iii) माझा आवडता नेता.